# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 21.06.2025** **वार- शनिवार**

---

योग

भक्ती आणि योगाच्या माध्यमातून आरोग्यदायी समाज निर्मितीसाठी प्रयत्न करूया असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जागतिक योग दिनाच्या निमित्तानं सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी आणि श्री संत तुकाराम महाराज संस्थान देहू यांच्याद्वारे आज पुण्यात आयोजित 'वारकरी भक्तीयोग' कार्यक्रमात बोलताना केलं. पुणे शहरातील 187 महाविद्यालयं, त्यातील प्राध्यापक आणि 6 हजार विद्यार्थ्यांनी योग दिनाचं नियोजन केलं. योग प्रशिक्षक डॉ. पल्लवी कव्हाणे यांच्या पथकानं उपस्थितांकडून योगाभ्यास करवून घेतला.

आयुष

केंद्रीय आयुष आणि सहकार मंत्रालयांद्वारे पुण्यात एक पृथ्वी… एक आरोग्य… या संकल्पनेवर आधारित योग शिबिरात प्रशिक्षण देण्यात आलं. केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि शेकडो नागरिक यात सहभागी झाले.

संचारयोग

पुणे मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते केंद्रीय संचार विभागाच्या पुणे कार्यालयातर्फे स्वारगेट मेट्रो स्टेशन इथं योगासनांचं महत्त्व आणि माहिती देणाऱ्या पुस्तक प्रदर्शनाचं उद्घाटन करण्यात आलं. विभागाचे संचालक निखिल देशमुख यावेळी उपस्थित होते. यावेळी महामेट्रो आणि केंद्रीय संचार विभागाचे कर्मचारी तसंच मेट्रोचे प्रवासी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

योग

पुणे शहरातील विविध व्यायाम शाळांमध्ये पहाटेपासूनच योगाभ्यासाची प्रात्यक्षिकं सादर करण्यात आली. सर परशुराम महाविद्यालयाच्या मैदानावर हजारो शाळकरी विद्यार्थ्यांनी योगासनांची प्रात्यक्षिकं केली तसंच महाराष्ट्रीयन मंडळाच्या वतीनं गेले चार दिवस विविध उपक्रम राबवण्यात आले. यामध्ये एक हजार विद्यार्थ्यांनी भाग घेतला. नांदे तलावात पाण्यावरील योगासनं पाहण्याची संधी पुणेकरांना मिळाली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि मनुश्री योग यांच्याद्वारे छत्रपती संभाजी महाराज उद्यानात योग साधना करण्यात आली. यामध्ये विविध वयोगटातील नागरिक सहभागी झाले होते. योगाचार्य नूतन जोंधळे आणि मच्छिंद्र रोडे यांनी प्रत्येकाला करता येतील असे साधे आणि सोपे योग प्रकार शिकवले.

कत्तलखाना

पिंपरी-चिंचवड महापालिका सुधारित विकास आराखड्यामध्ये प्रस्तावित केलेला मोशी आणि तीर्थक्षेत्र आळंदीच्या परिसरातील कत्तलखान्याचे आरक्षण रद्द करण्यात येईल अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात केली. ग्रामस्थांनी अलिकडेच मुख्यमंत्र्यांना याबाबत निवेदन दिलं होतं. कुठल्याही परिस्थितीमध्ये हा कत्तलखाना होऊ दिला जाणार नाही असं फडणवीस यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं.

वारी

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या संत श्री ज्ञानेश्वर महाराज आणि संत श्री तुकाराम महाराजांच्या पालख्यांचा आज पुण्यात मुक्काम असल्यानं शहरातील वातावरण भक्तिमय झालं आहे. मुक्कामाच्या ठिकाणी भाविकांनी पहाटेपासूनच दर्शनासाठी रांगा लावल्या आहेत. वारकऱ्यांच्या सेवार्थ राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, गणेश मंडळं आणि रहिवासी कॉलनी यांनी विविध सामाजिक उपक्रमांचं आयोजन केलं आहे.  या परिसराला यात्रेचं स्वरूप आलं आहे. काही वारकऱ्यांनी आजचा विसाव्याचा दिवस पर्यटनासाठी  दिला आहे. पोलीस प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या प्रमाणात तैनात आहेत. उद्या पहाटे दोन्ही पालख्या हडपसरमार्गे आपल्या पुढील मुक्कामासाठी मार्गस्थ होणार आहेत.

वारी

वारकऱ्यांसाठी पुणे शहरातील संस्था-संघटनांकडून विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं. अक्षर दिंडी'च्या वतीनं बोरूच्या सहाय्यानं 'पसायदान' साकारत सामाजिक प्रबोधनाचा संदेश देण्यात आला. योगेश ओगले यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'अक्षर दिंडी'तून सामाजिक समतेचे संदेश देणारे अभंग, ओवी यांच्यासह पाणी-वीज बचत, संविधान जागृती, आरोग्य भान, पर्यावरण संवर्धन, इत्यादी विषयांवर जनजागृती करण्यात आली. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीनं सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या वारकऱ्यांना 'जगद्गुरू संत शिरोमणी तुकाराम महाराज जीवनगौरव पुरस्कारानं सन्मानित करण्यात आले. निसर्ग उपचार केंद्र आणि समितीच्या वतीनं वारकऱ्यांसाठी मोफत 'मालिश सेवा' उपक्रमही राबविण्यात आला.

कर

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागानं मालमत्ता कर भरणाऱ्यांसाठी विविध सवलती जाहीर केल्या असून त्या मिळविण्यासाठी आता केवळ 10 दिवस बाकी आहेत.  मालमत्ताधारकांनी या सवलतींचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असं आवाहन विभागाच्या वतीनं करण्यात आलं आहे. महानगरपालिकेनं 'सिद्धी उपक्रम' अंतर्गत महिला बचत गटांमार्फत 6 लाख 35 हजार मालमत्ता धारकांना घरोघरी जाऊन बिलांचं वाटप केलं आहे. यामुळं एप्रिलपासून 359 कोटी 85 लाख रुपये मालमत्ताकर संकलित झाला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**